**CNR No.MHNG080014412019**

नियमीत फौजदारी खटला क्र.२१९/२०१९
महाराष्ट्र सरकार विरुध्द मोहम्मद जुबेर मो. आरिफ
अपराध क्र.२२२/२०१९, पो.स्टे. नवीन कामठी

निशाणी क्र.०३ वरील आदेश
(पारित दि.०८.०४.२०२६)

प्रस्तुतचा अर्ज व सरकारी वकील यांचे म्हणणे याचे अवलोकन केले. निशाणी क्र.३ कडील अर्जामधील अर्जदार रूपराव रामदास कु-हे तर्फे वकील श्री. यादव आणि सरकारी वकील यांचा युक्तीवाद ऐकला. निशाणी क्र.०५ कडील कागदपत्रांच्या यादीसह सादर करण्यात आलेल्या अर्जदारांच्या आधार कार्डची पडताळलेली प्रत, वाहन तपशीलाच्या प्रमाणपत्राची संगणकीय प्रत व एफ.आय.आर ची प्रत इत्यादी कागदपत्रांचे अवलोकन केले. सदर कागदपत्रांवरुन सदर वाहन अर्जदाराच्या मालकीचे असल्याचे दिसून येते. अर्जदार याच्या व्यतिरिक्त इतर कोणीही आजतागायत सदरच्या वाहनवर हक्क सांगितला नाही. सदरचे वाहन पोलीस स्टेशनला पडून राहिल्यास त्याची हानी होऊ शकते. याशिवाय, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ नुसार देण्यात येणारा मुद्देमालाचा ताबा हा तात्पुरत्या स्वरुपाचा असतो. या सर्व बाबींचा विचार केला असता, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल, या मतास मी पोहचलो आहे. करीता मी खालील आदेश पारीत करतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अपराध क्र.२२२/२०१९, नवीन कामठी पोलिस स्टेशन यातील जप्त मुद्देमाल म्हणजेच “ACE ZIP bearing Registration No.MH-40-BG-5719, ENG.No.G600WIVDS7M8790454, CHAS. No. MAT491014H6P 28400” वाहन हे अर्जदार याला रक्कम रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख फक्त) च्या सुपुर्तनाम्यावर परत देण्यात यावा.

३. तपासी अधिकारी, पोलीस स्टेशन नवीन कामठी यांनी वर नमूद वाहनाच्या मुळ कागदपत्राची व चालू कालावधीच्या विमा कागदपत्राची पडताळणी करुन सविस्तर पंचनामा केल्यानंतर वाहन हे अर्जदार चे ताब्यात द्यावे व पंचनामा व ईतर कागदपत्रे या प्रकरणात दाखल करावे.

४. अर्जदार ने मुद्देमाल यात कुठलाही बदल करु नये.

५. अर्जदारने न्यायालय सांगेल त्यावेळेस मुद्देमाल तपासी अधिकारी किंवा न्यायालया समक्ष हजर करावा.

६. सदर मुद्देमाल परत करताना तपासी अंमलदार यांनी या मुद्देमालाची तीन रंगीत छायाचित्रे काढून ती खटल्याच्या निकालापर्यंत जतन करुन ठेवावीत.

७. अर्जदार यांनी बंधपत्र संबंधित पोलीस ठाण्यात सादर करावे. तपास अधिकारी, नवीन कामठी पोलीस स्टेशन यांना पत्र जारी करण्यात यावे.

(न्यायासनावर निवेदीत आणि अधिघोषित.)

MOHAN RAMCHANDRA KAMAT

Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2026.04.08 17:02:16 +0530

ठिकाणी - कामठी
दिनांक – ०८/०४/२०२६

(एम.आर. कामत )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्या.क्र.१, कामठी.

**–: प्रमाणपत्र :–**

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. निकालपत्र आदेश यामधील सर्व मजकूर मूळ निकालपत्र आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | पायल ग. अंड्रस्कर |
| न्यायालयाचे नांव | मोहन रा. कामत<br>(प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी, न्यायालय क्र. १ कामठी) |
| टाईप केल्याचा दिनांक | ०८.०४.२०२६ |
| न्यायिक अधिका–यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | ०८.०४.२०२६ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | ०८.०४.२०२६ |